# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई-मेल :managerbcr@mahadiscom.in
२४०१३५०५ (वै)
ग्राम : पर्साग्रीड, मुंबई .
**फॅक्स** : २४०२५७६३

दुरध्वनी क्रं. : ०२२-२४०७७४
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं. १, धारावी रोड,
माटुंगा, **मुंबई** - ४०० ०१९.

क्र. माप्रवि /मावक /५२१९

दिनांक : १०/०२/२०११

## परिपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने व आताच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी कंपनीच्या सांघिक कार्यालयात दि. २५/०७/१९८३ पासून मागासवर्गीय कक्ष कार्यान्वीत केला आहे व त्यामार्फत मागासवर्गीयांच्या आरक्षणा संदर्भातील शासनाच्या निर्णयांची अंमलबजावणी केली जाते. आता शासनाने शासन परिपत्रक क्रंमाक बीसीसी - २०१० / प्र.क्र.४०९ /१६-ब दि. १६/०८/२०१० अन्वये ज्या कार्यालयामध्ये ५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे अशा कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने मा. कार्यकारी संचालक (मा.सं.), यांनी दिलेल्या मंजुरीनुसार खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

अलीकडे कपंनीने मनुष्यबळाचा आढावा घेऊन प्रसारीत केलेल्या नवीन आकृतीबंधामुळे मंडल व विभागीय स्तरावर मागासवर्गीय कक्ष, कार्यान्वीत करण्यासाठी लागणारी स्वंतत्र पदे निर्माण करणे सद्यस्थितीत शक्य नाही. सांघिक कार्यालयात यापूर्वीच मागासवर्गीय कक्ष कार्यान्वीत आहे. त्यामुळे सद्य स्थितीत मागासवर्गीयांच्या आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी व मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींचे तत्परतेने निराकरण व्हावे या हेतूने कंपनीअंतर्गत मंडल कार्यालय स्तरावर सहाय्यक व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग), व विभागीय कार्यालय स्तरावर कनिष्ठ व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) यांना त्यांच्या नियमित कामासह उपरोक्त कामासाठी " समन्वयक " (co-ordinator )म्हणून काम करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. तसेच यापूर्वी परिपत्रक क्रमांक जीएडी/ बीसीआर/ ३सी/२०४४ दिनांकं ०६/०९/१९९३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार त्या त्या परिमंडळाचे व्यवस्थापक (क) हे समन्वयक (co-ordinator) म्हणून त्या परिमंडळाकरीता काम पाहतील.

कपंनीतील सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, वरील आदेश आपल्या कार्यक्षेत्रात काम करणा-या व्यवस्थापक (क) , सहा. व्यवस्थापक (क) व कनिष्ट व्यवस्थापक (क) यांच्या निदर्शनास आणून द्यावेत. वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल ते पहावे.

मुख्य महाव्यवस्थापक (तां./आ.)

निर्गमित
दिनांक 11 FEB 2011
सही

O/C

**प्रति,**
कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत
(प्रेषण यादीप्रमाणे)

E:\english marathi letter\circular jan 2011\circular 10 02 2011.doc

GR-16-08-2010